# <u>प्रेसनोट</u>

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 293/2022 दिनांक : 01.08.2022

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**नांदेड ग्रामीण** :–दिनांक 30.07.2022 रोजी चे 19.00 वा. चे सुमारास, **सुनिलनगर रोडवर डेमो बकीट गोडावुन शुभम लोहबंदे यांचे पानपटी जवळ नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे दाजी चालवत असलली मो सा थांबवुन मागील भांडणाचा राग मनात धरून चाकुने पोटात, डोक्यात, गळयावर व गालावर मारून गंभीर जखमी करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी अजय पि. चंद्रकांत कसबे, वय 25 वर्षे, व्यवसाय चालक रा. पवनसुत कॉलनी तिरूपतीनगर धनेगाव ता. जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 471/2022 कलम 307, 323, 34, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री कोरे, मो. नं. 8888836607** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :–

**भाग्यनगर** :–दिनांक 31.07.2022 रोजी चे 18.15 वा. चे सुमारास, **सम्राटबारचे बाजुस निळारोड ता. जि. नांदेड येथे,** फिर्यादी व त्यांचे दोन मित्र सम्राट बारचे बाजुस निळा रोडचेखाली नांदेड येथे थांबले असता यातील अज्ञात चार आरोपीतांनी संगणमत करुन दोन मो सा वर येवुन त्यातील एकाने फिर्यादी व त्याचे मित्र यांना खंजरचा धाक दाखवुन इतर तिघांनी जबरीने खिशातील रेडमी कंपणीचे दोन मोबईल किंमती 37,000/–रूपयाचे व नगदी 450/–रूपये असा एकुण 37,450/–रूपयाचा माल जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी रविराज पि. रामराव वाडेकर, वय 18 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. पोर्णीमानगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 263/2022 कलम 392, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री घुगे, मो.क्रं. 9423614653** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :–

**इतवारा** :– दिनांक 19.07.2022 रोजी 14.00 ते 15.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरा समोरून रहेमतनगर देगलुरनाका रोड नांदेड येथे,** यातील फिर्यादीची पॅशन प्रो कंपनीची काळया रंगाची मो.सा. क्रं. एमएच–26/एबी–3223 किंमती 30,000/– रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी सादत हुसेन अमिन पि. मुजीब हसन खान निजामी, वय 45 वर्षे, व्यवसाय मेकॅनिक रा. रहेमतनगर, देगलुरनाका नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरन 193/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1821 शेख रसुल, मो.क्रं. 9764422380** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**नांदेड ग्रामीण** :–दिनांक 27.07.2022 रोजी 22.10 वा. चे सुमारास, **मिल्लतनगर गल्ली क्रं. 04 ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करुन जुन्या भांडणाचे कारणावरुन जम्मु याने त्याचे हातातील चाकुने फिर्यादीचे डावे बाजुस पाठीत चाकुने मारून गंभीर दुखापत केली व इतर तिघांनी लाथाबुक्यांनी व हाताच्या पंचने (बुक्कीने) मारहाण करून मुक्का मार दिला आहे. व जिवे मारण्याची धमकी दिला. वगैरे **फिर्यादी शेख सोहेल शेख मुनीर, वय 20 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. एकबालनगर देगलुर नाका ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 468/2022 कलम 326, 324, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोउपनि/श्री कदम, मो. नं. 9284351496** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :–

**1)वजिराबाद** :– दिनांक 16.12.2013 रोजी चे 14.00 ते दि. 18.02.2022 चे 12.00 वा. चे दरम्यान, **असलम ग्राउंड पाण्याचे टाकीजवळ खडकपुरा नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस बाईस तुला घरकाम येत नाही व तुझ्या वडीलांकडुन 50,000/–रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करुन शारिरीक व माणसीक छळ केला व जिव मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 25 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 264/2022 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1020 आडे, मो.क्रं. 9823467191** हे करीत आहेत.

**2)नायगाव :–** दिनांक 15.07.2011 रोजी ते दि. 11.07.2022 रोजी चे 10.00 वा. चे दरम्यान, **विरभद्र गल्ली जळकोट ता. जळकोट जि. लातुर ह. मु. बेळगेनगर नायगावं ता. नायगांव जि. नांदेड येथे**, यातील नमुद आठ आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस बाईस तुझ्या माहेरहुन घेवुन आली नाहीस, तु दिसायला चांगली नाहीस, तु माहेरहुन कांही आणली नाहीस धंदा टाकण्यासाठी माहेरहुन पैसे घेवुन ये म्हणुन पैशाची मागणी करून शिवीगाळ व मारहाण करुन शारिरीक व माणसीक छळ केला व जिव मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 30 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरनं 115/2022 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/मुस्तापुरे, मो.क्रं. 9421757365** हे करीत आहेत.

## 6)अपघात :–

**हदगांव :–** दिनांक 28.07.2022 रोजी चे 20.20 ते 21.00 वा. चे दरम्यान, **हदगाव ते तामसा जाणारे रोडजवळ सुर्या गिट्टी क्रेशर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे संतोष किशनराव कदम, वय 40 वर्षे, रा. विठ्ठल मंदीरा जवळ तामसा ता. हदगाव जि. नांदेड** यांनी आपले ताब्यातील मो सा क्रं एमएच–26/बिएन–1627 हि हदगाव ते तामसा जाणारे रोडवर हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन गंभीर अपघात करून स्वतःचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी संदीप संभाराव फाळके, वय 31 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. ग्रीनपार्क हदगाव ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगांव** गुरनं. 233/2022 कलम 279, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री गायकवाड, मो.क्र. 8308161089** हे करीत आहेत.

## 7)शासकीय कामात अडथळा :–

**नायगाव :–**दिनांक 30.07.2022 रोजी चे 12.50 वा. चे सुमारास, **जि.प. कें. प्रा. शाळा गडगा ता. नायगाव जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादी हे जि. प. कें. प्रा. शाळा गडघ्याचे मुख्याध्यापक असुन दिनांक 30.07.2022 रोजी इयत्ता पाचवीची स्कॉलरशिप परिक्षा विद्यार्थी नियोजन बैठक चालु असतांना यातील नमुद आरोपीने गडगा गावातील शालेय व्यवस्थापन समीतीचे सदस्य हा कार्यालयात येवुन फिर्यादीचे गालावर थापड उगारून मारहाण करून अश्लील भाषेत शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. व शासकीय कामात अडथळा निर्माण केला. फिर्यादीची मनस्थीती चांगली नसल्याने आज रोजी फिर्याद दिली. वगैरे **फिर्यादी गुंडेराव भागवत गबाळे, वय 54 वर्षे, व्यवसाय नौकरी जि. प. कें. प्रा. शाळा गडगा मुख्याध्यापक रा. सावरगाव (पिर) ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरनं 114/2022 कलम 353, 332, 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री वाघमारे मो.क्रं. 9096618251** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :–

**1)हदगांव :–** दिनांक 31.07.2022 रोजी चे 17.10 वा. चे सुमारास, **मौ. निवघा (बा.) शेवंताबाई किराणा ॲण्ड जनरल स्टोअर्स समोरील रोड लगत ता. हदगांव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्रा एकुण किंमती 2400/–रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/900, बालाजी व्यंकटी सातपुते, ने. पोस्टे हदगांव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगांव** गुरनं 234/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/35 चिंतले, मो.क्र. 9284056205** हे करीत आहेत.

## 9)जळुन मृत्यु :–

**शिवजीनगर :–**दिनांक 31.07.2022 रोजी चे 16.30 वा. चे सुमारास, **सरकारी दवाखाना विष्णुपूरी ता. जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे शेखर राष्ट्रपाल दवणे, वय 16 वर्षे, रा. आंबेडकरनगर, नांदेड**, हा त्याचे घरी गॅसवर चहा करीत असतांना गॅसचा अचानक भडका झाल्याने जळाला असता त्यास उपचार कामी सरकारी दवाखाना विष्णुपूरी नांदेड येथे दाखल कला असता उपचारा दरम्यान मरण पावला. वगैरे **खबर देणार विशाल रमेश दवणे, वय 30 वर्षे, रा. आंबेडकरनगर नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे शिवाजीनगर** आ. मृ. **25**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2753 शेख, मो.नं. 9923799345** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 294/2022 दिनांक : 01.08.2022**

### पोलीस अधिक्षक कार्यालयात "साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे " यांची जयंती साजरी

01 ऑगष्ट, 2022 सोमवार रोजी **"साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे"** या महापुरुषाची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली आहे. या प्रसंगी **मा. श्री प्रमोद शेवाळे,** पोलीस अधिक्षक नांदेड यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले आहे. या प्रसंगी **मा. श्रीमती अश्विनी जगताप मॅडम,** पोलीस उप अधिक्षक (मु.) नांदेड, **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी, नांदेड व ईतर शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार, मंत्रालायीन कर्मचारी मोठया संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन पोउपनि उत्तम वाघमारे, सपोउपनि सुर्यभान कागणे, पोना संजय सांगवीकर यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड



# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 295/2022 दिनांक : 01.08.2022

## नांदेड पोलीस दलातील एक पोलीस अधिकारी पाच पोलीस अंमलदार सेवा निवृत्त...

नांदेड पोलीस दलातील एक पोलीस अधिकारी व पाच पोलीस अंमलदार यांचा नियत वयोमानानुसार दिनांक 31.07.2022 रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. **मा. श्री प्रमोद शेवाळे**, पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. डॉ. अश्विनी जगताप**, पोलीस उपअधिक्षक(मु.)नांदेड यांचे हस्ते आज दिनांक 01/08/2022 रोजी सर्व सेवानिवृत्तांचा पुष्पगुच्छ, शाल श्रीफळ व भेट वस्तु देवुन सत्कार करण्यात आला. सदर सत्कार समारंभ पोलीस अधिक्षक कार्यालयात पार पडला. सर्व सत्कार मुर्तीनी आता आपल्या कुटूंबाकडे लक्ष् द्यावे व सुखी समाधानाने आनंदी जिवन जगन्याचा सल्ला दिला. सदर सत्कार समारंभास. **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी नांदेड, **मसपोनि कमल शिंदे**, पोलीस कल्याण विभाग नांदेड, **मपोउपनि सौ. स्नेहा पिंपरखेडे**, प्रशिक्षण विभागा नांदेड तसेच ईतर शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार कर्मचारी मोठया संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सपोउपनि **श्री विठ्ठल कत्ते** यांनी केले असुन, मपोकॉ राखी कसबे, रुपा कानगुले यांनी कार्यक्रमाचे नियोजन चांगल्या प्रकारे केले.

| अ.क्र. | हुद्दा | सेविनिवृत्त अधिकारी/कर्मचारी नाव | नेमणुक |
|---|---|---|---|
| 01 | सपोनि | भुमन्ना मारोती आचेवाड, | पोलीस नियंत्रण कक्ष नांदेड |
| 02 | सपोउपनि/5198 | चंद्रमोहन मारोती जोंधळे | पोलीस मुख्यालय नांदेड |
| 03 | सपोउपनि/5162 | भानुदास गणपती चव्हाण | पोलीस मुख्यालय नांदेड |
| 04 | सपोउपनि/5003 | केशव रामराव हाके | पोलीस मुख्यालय नांदेड |
| 05 | पोहेकॉ/1512 | दिलीप काशिनाथ कांबळे | पोस्टे मनाठा |
| 06 | पोहेकॉ/271 | ठब्राहीम लालमोहम्मद पिजांरी | पोस्टे उमरी |

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड